# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

४था मजला, एक्सप्रेस टॉवर्स, नरीमन पॉईंट, मुंबई .२१

जावक क्र.मजीप्रा/सस/ताशा.१/३५०/ 533 दिनांक : १४/२/२००१

// परिपत्रक क्रमांक // ६४.

विषय :- ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी पाईप्सची खरेदी न करणे बाबत.
संदर्भ :- या कार्यालयाचे परिपत्रक क्रमांक ३८ दिनांक २३/३/२०००

ग्रामीण पाणी पुरवठा योजनांमध्ये अंतर्भूत असणाऱ्या सर्व कामांची साहित्य सामग्रीच्या पुरवठ्यासह एकत्रित अेक निविदा काढण्याच्या शासनाच्या धोरणानुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरणा तर्फे निविदा काढण्यात आल्या असल्याने ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी लागणारे पाईप्स स्वीकृत निविदेच्या ठेकेदाराकडून आणण्यात येतात. प्राधिकरणाकडील निधीची स्थिती लक्षात घेता प्रगतीपथावरील सर्वच पाणी पुरवठा योजनांना आवश्यक तेवढा निधी वर्ग करणे अशक्य झाल्याने कोणत्याही पाईप्सचा पुरवठा नव्याने प्राप्त करुन न घेण्याचे धोरण स्वीकारण्यात आले आहे याची आपणास कल्पना आहेच. या अनुषंगाने संदर्भीय परिपत्रकाव्दारे सूचनाही निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

तथापि माझ्या असे निदर्शनास आणून देण्यात आले आहे की काही ठिकाणी अद्यापही पाईप्सचा पुरवठा प्राप्त करुन घेण्यात येत आहे ही बाब नियमांचे / सूचनांचे उल्लंघन करणारी आहे. अशी प्रकरणे तपासणी मध्ये आढळल्यास संबंधितांवर कडक कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

ज्या योजनांचे स्त्रोत खात्रीचे आहेत, योजना कार्यान्वित झाल्यानंतर त्या संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांना हस्तांतरीत होण्याची खात्री आहे किंबहुना दिनांक १२/१/२००१ चे परिपत्रक क्रमांक ५९ मधील सूचनाची पूर्तता ज्या ठिकाणी झालेली आहे अशा योजनांसाठी जर पाईप्स खरेदी करावे लागणार असतील तर तसा प्रस्ताव या कार्यालयास मंजुरीसाठी प्राप्त होणे अपेक्षित आहे. मात्र असा प्रस्ताव सादर करताना आवश्यक असणारे पाईप्स अतिरिक्त म्हणून कोठे उपलब्ध आहेत व ते उचलण्यासाठी वाहतूक खर्च किती अपेक्षित आहे याचा स्पष्ट उल्लेख प्रस्तावात असणे आवश्यक आहे. उपरोक्त मुद्यांची पूर्तता झाल्यास सदर प्रस्तावांचा मंजुरीसाठी विचार होईल. मात्र तत्पूर्वी क्षेत्रीय स्तरावरुन कोणतेही पाईप्स पुरविण्याबाबत कंत्राटदारांना कळविण्यात येवू नये असे स्पष्ट आदेश पुन्हा देण्यात येत आहेत.याची जाणीव पूर्वक नोंद घेण्यात यावी.

( राजेंद्र सगणे )
सदस्य सचिव (तांत्रिक)

प्रत,

मा.मंत्री, ग्रा.वि., पा.पु.व स्व. मंत्रालय, मुंबई यांचे माहितीसाठी सादर
मा.राज्यमंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता , मंत्रालय, मुंबई याचे माहितीसाठी सादर
मा.राज्यमंत्री , नगर विकास तथा म.जी.प्रा. चे उपाध्यक्ष, मंत्रालय, मुंबई, यांचे माहितीसाठी सादर
प्रधान सचिव, पा.पु.व स्व.वि. मंत्रालय मुंबई, यांचे माहितीसाठी सादर
विशेष कार्य अधिकारी व मुख्य अभियंता, म.जी.प्रा. नवी मुंबई यांचे माहितीसाठी व कार्यवाहीसाठी
सर्व मुख्य अभियंता, म.जी.प्रा. यांचे माहितीसाठी
वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी, म.जी.प्रा. नवी मुंबई यांचे माहितीसाठी
मुख्य प्रशासकीय अधिकारी, म.जी.प्रा. मुंबई यांचे माहितीसाठी
सर्व अधीक्षक अभियंता, , म.जी.प्रा.मंडळ यांचे माहितीसाठी.
सर्व कार्यकारी अभियंता ,म.जी.प्रा.वा.विभाग यांचे माहितीसाठी

M. J. P.
ISSUED
15 FEB 2001
MUMBAI-21